**कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना**

**टोल फ्रि क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 06.08.2019.**

निरंतर शिक्षण कार्यालय, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना, जि.जालना येथील श्री. नरेंद्र छगन साळुंके,वय 49, व्यवसाय नोकरी वरिष्ठ लिपीक, **यांना 2000/- रुपयाची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री. नरेंद्र छगन साळुंके,वय 49, व्यवसाय नोकरी वरिष्ठ लिपीक, शिक्षण अधिकारी, निरंतर शिक्षण कार्यालय, जिल्हा परिषद, जालना, रा. 7/40, कोठला कॉलनी, जिल्हा कोर्टा समोर, औरंगाबाद, मुळ रा. मौजे मोहिदे, ता.चोपडा, जि.जळगांव |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 06/08/2019 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात स्वच्छतागृहा समोर, जालना, जि.जालना. |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 2000/- रुपये |

याबाबत हकीगत अशी की, तक्रारदार हे निरंतर शिक्षण विभाग, जिल्हा परिषद येथुन सन 2017 मध्ये सहायक प्रकल्प अधिकारी म्हणुन सेवा निवृत्त झाले असुन त्यांना सातवे वेतन आयोगाचा लाभ मिळावा म्हणुन त्यांनी त्यांचे निरंतर शिक्षण कार्यालय, जिल्हा परिषद, जालना येथील वरिष्ठ लिपीक श्री श्री. नरेंद्र छगन साळुंके यांची भेट घेवुन त्यांना सातव्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करुन व वेतन पडताळणीसाठी पाठवून त्यानंतर मंजुरीसाठी ए.जी.नागपुर येथे पाठविण्याची विनंती केली असता,वरीष्ठ लिपीक श्री.साळुंके यांनी सदर कामासाठी त्याना 2000/- रु. लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना श्री.नरेंद्र छगन साळुंके,वय 49, व्यवसाय नोकरी वरिष्ठ लिपीक, शिक्षण अधिकारी, निरंतर शिक्षण कार्यालय, जिल्हा परिषद, जालना यांना लाच देण्याची ईच्छा नसल्यांने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दि.06.08.2019 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना, येथील निरंतर शिक्षण कार्यालय, (जिल्हा परिषद) येथे जावुन पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान पंचा समक्ष श्री. नरेंद्र छगन साळुंके,वय 49, व्यवसाय नोकरी वरिष्ठ लिपीक, शिक्षण अधिकारी, निरंतर शिक्षण कार्यालय, जिल्हा परिषद, जालना, यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी 2000/-रुपयाची मागणी करुन तक्रारदार यांचे कडुन दि.06/08/2019 रोजी पंचासमक्ष 2000/- रुपये स्विकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. श्री. नरेंद्र छगन साळुंके,वय 49, व्यवसाय नोकरी वरिष्ठ लिपीक, शिक्षण अधिकारी, निरंतर शिक्षण कार्यालय, जिल्हा परिषद, जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

(रविंद्र डी. निकाळजे)

**पोलीस उपअधीक्षक,**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.